दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२६ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# हायकोर्टाने राणा दाम्पत्याला झापले ; याचिका फेटाळली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना मुंबई उच्च न्यायालयानं दणका दिला आहे. राणा दाम्पत्यानं त्यांच्याविरुद्ध दाखल झा-लेले गुन्हे रद्द करण्याची मागणी याचिकेतून केली होती. मात्र ही याचिका न्यायालयानं फेटाळून लावली आहे. एकाच दिवशी दोन घटना घडल्यानं दोन एफआयआरची गरज काय, असा प्रश्न राणा दाम्पत्याकडून उपस्थित करण्यात आला होता. आमच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या दोन एफआयआर एकत्र करा, अशी मागणी त्यांच्याकडून करण्याच आली. मात्र ती मागणी न्यायालयानं फेटाळून लावली.**



मुंबई पोलिसांनी कलम १५३ (अ) अंतर्गत राणा दाम्पत्याला अटक केली. अटकेसाठी गेलेल्या पोलिसांसोबत हुज्जत घातली, त्यांना धक्काबुक्की केल्याचा दावा सरकारी वकिलांकडून करण्यात आला. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी राणा दाम्पत्याविरोधात कलम ३५३ गुन्हा दाखल करण्यात आला. याची नोंद वेगळ्या एफआयआरमध्ये करण्यात आली.

दोन्ही एफआयआर एकाच घटनेशी संबंधित आहेत. त्यामुळे दोन वेगळ्या एफआयआरची गरज काय, त्या एकाच एफआयआरमध्ये समाविष्ट करण्यात याव्या, अशी मागणी राणांचे वकील रिझवान मर्चंट यांनी केली. मात्र ही मागणी न्यायालयानं फेटाळली. दोन वेगवेगळ्या घटना आहेत. पहिला एफआयआर सामाजिक तेढ निर्माण करणारं विधान केल्याप्रकरणी आहे. तर दुसरा एफआयआर पोलिसी कारवाईत अडथळा आणल्या प्रकरणी आहे, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

तुम्ही लोकप्रतिनिधी आहात. घटनेनं तुम्हाला काही विशेषाधिकार दिले आहेत. अधिकारांसोबत जबाबदाऱ्या येतात. तुम्ही पोलिसांना सहकार्य करणं अपेक्षित होतं. तुम्हाला जर जबाबदाऱ्यांचा विसर पडला असेल तर मग तुमच्याविरोधात कारवाई गरजेची आहे, अशा शब्दांत न्यायमूर्तींनी राणा दाम्पत्याला सुनावलं.

# हनुमान चालिसा वाचायचीय, माझ्या घरी या, पण दादागिरी नाही : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**



खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्यामुळे गेले तीन दिवस राज्यातील वातावरण तापलेले आहे. राणा दाम्पत्याला अटक झाली आहे. यावरून लोकसभेने राज्य सरकारला २४ तासांत राणांसोबत खार पोलीस कोठडीत झालेल्या गैरव्यवहारावर उत्तर मागितले आहे. या साऱ्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी मोठी घोषणा केली आहे.

जर कोणाला हनुमान चालिसा वाचायची असेल तर घरी येऊन वाचा, त्याचीही एक पद्धत असते. दादागीरी करून येऊ नका, बाळासाहेबांनी ही दादागिरी कशी मोडायची हे शिकविले आहे, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बेस्टच्या एनसीएमसी कार्डचा लोकार्पण सोहळा झाला, तेव्हा त्यांनी अराजकीय कार्यक्रमात बोलायचे नाहीय पण गेल्या काही दिवसांपासून जे सुरु आहे, त्यावर बोलावे लागेल असे ते म्हणाले.

शिवसेनेने हिंदुत्व सोडले, हे सांगितले जाते. ते काय धोतर आहे का?आमचे घंटाधारी नाही तर गदाधारी हिंदुत्व आहे. तुम्ही हिंदुत्वासाठी काय केले? बाबरी पाडली तेव्हा कुठे बसलेले? राम मंदीर बांधण्याचे म्हणताय तर तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाचा आहे, तुमचा नाही, तुम्ही तर ते बांधण्यासाठी हात पसरले, अशी टीका त्यांनी भाजपावर केली. याचबरोबर त्यांनी नवनीत रवी राणा यांच्या मातोश्रीसमोर हनुमान चालिसा पठण करण्याच्या आव्हाना-चाही समाचार घेतला. बाळासाहेब म्हणालेले घंटा बडविणारा हिंदू नकोय, तर दहशतवाद्यांना बडविणारा हिंदू हवा आहे. तुम्हाला हनुमान चालिसा घरी वाचायची असेल, तशी संस्कृती तुमच्या घरात नसेल तर माझ्या घरी वाचू शकता, परंतू त्याची एक पद्धत असते. साधू संत येती घरा, तोची दिवाळी दसरा, साहेबांच्या काळातही येत होते. पण दादागिरी कराल तर ती मोडून काढू, लवकरात लवकर मी एक जाहीर सभा घेणार आहे. मी किंवा अजित पवार मास्क काढत नाही, तोवर तुम्हीही मास्क काढू नका. सक्ती नसली तरी मुक्ती मिळालेली नाही. मला मास्क काढून बोलायचे आहे. एकदाचा सोक्षमोक्ष लावूनच टाकणार आहे, अशी घोषणा उद्धव ठाकरेंनी केली आहे.

# पनवेलजवळ ब्रेक फेल होवून ट्रकला अपघात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलजवळील मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे मुंबई लेनवर खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत किलोमीटर १.७५० येथे आज झालेल्या ब्रेक फेल होवून ट्रकच्या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असले तरी या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही.

यातील ट्रक क्र. एमएच १० सीआर १८६६ यावरील चालक फक्रुद्दीन सिराज नदाफ वय.३६,रा.तळसंदे हा मुंबई बाजूकडे चालवित जात असताना समोरून चालणारे कंटेनर ट्रेलरने अचानक ब्रेक मारल्याने ट्रक वरील चालकाने ब्रेक मारला असता ब्रेक फेल होऊन त्याचा त्यांचे ट्रक वरील नियंत्रण सुटून ट्रक रस्त्याच्या डावे बाजूचे रेलिंगला धडक देऊन रेलिंग तोडून अपघात केला आहे. सदर अपघातामध्ये कोणीही जखमी नसून ट्रकचे नुकसान झालेले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांची पथक सदर ठिकाणी पोहचून त्यांनी अपघातग्रस्तांना मदत केली. तसेच सदरचे वाहन रोडच्या तिसरे लेनवर असल्याने त्याठिकाणी कोन लावले. त्यानंतर दोन्ही लेनवरुन वाहतूक सुरळीत केली.



# मोटरसायकल स्वाराचा ट्रेलरच्या धडकेत अपघाती मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नवघर - कोप्रोली मार्गावरील भेंडखळ गावाजवळ ट्रेलर च्या धडकेत मोटारसायकल स्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना काल सायंकाळच्या सुमारास घडली आहे.

नंदकुमार राजाराम टावरी (३८) हा इसम पेण तालुक्यातील रावे गावाचा रहिवाशी असून तो कामानिमित्त उलवे नोड मध्ये राहत आहे. आपल्या चुलत भावाच्या लग्नला तो उलवे येथून आपल्या मूळ गावी रावे येथे निघाला होता. रस्त्यातच भेंडखल गावाजवळ भरधाव येणाऱ्या गुरुकृपा लॉजीस्टिक ट्रेलरचे धडक दिल्याने त्याच्या डोक्याला दुखापत होऊन नंदकुमार टावरी या युवकांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. उरणचा जेएनपीटीच्या माध्यमातून विकास झाला आहे रस्तेही सुसाट झाले आहे मात्र या रस्त्यावर युवकांचे मरण काही थांबत नाही. आजपर्यंत जवळपास आठशेहुन अधिक स्थानिक युवकांना आपला जीववावा लागला आहे. रस्त्यावर भरधाव वाहने नियमांचे उल्लंघन करून सुरूच आहेत आजही रस्त्यावर दुतर्फा वाहने पार्क करून उभी केली जात आहेत त्यामुळे अपघात होत आहेआणि आज या युवकाला आपला जीव गमवावा लागला आहे.



## संक्षिप्त...

### शिक्षणाधिकारी २५ हजाराची लाच स्विकारताना अटक

**दै.रायगड नगरी । पालघर**

पालघर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या वादग्रस्त ठरलेल्या शिक्षणाधिकारी लता सानप ह्यांना एका शिक्षिके कडून आपल्या घरात २५ हजाराची लाच स्वीकारताना पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडले. जिल्हा निर्मिती पासून जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग पैश्याच्या मागणी साठी अत्यंत बदनाम विभाग म्हणून ओळखला जात होता. तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्याला तीन वर्षांपूर्वी कार्यालयाच्या बाहेर लाच घेताना लाचलुचपत विभागाने पकडले होते.

त्यानंतरही ह्या विभागातील कामकाजात कुठलाही सकारात्मक बदल झालेला नव्हता. पालघरमध्ये शिक्षणाधिकारी पदाचा कारभार हाती घेतल्या नंतर लता सानप ह्यांच्या उर्मट वागण्याचा अनुभव अनेकांना आला होता. जिल्हा परिषद पदाधिकारी, सदस्य ह्यांचा मानसन्मान त्या ठेवत नसल्याचे आणि उद्धट वागत असल्याच्या तक्रारी करून त्याची बदली करावी असा ठराव जिल्हापरिषदेच्या सभेत घेण्यात आला होता. नुकत्याच पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या महिला व बालकल्याण समितीच्या बैठकीत समितीने त्याच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करीत कडक ताशेरे ओढले होते.तरीही त्यांच्या वागण्यात कुठलाही बदल होत न्हवता. जिल्ह्यातील एका शिक्षिकेची बदली करण्यासाठी सोमवारी शिक्षणाधिकारी लता सानप ह्यांनी शिक्षिकेकडे २५हजाराची लाच मागितली होती. ह्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर लता सानप ह्याच्या घरात २५ हजाराची लाच घेताना पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्यावर झडप घालीत त्यानं ताब्यात घेतल्याचे उपअधीक्षक नवनाथ जगताप ह्यांनी सांगितले.

# नव्याने सुशोभीकरण झालेला वडाळे तलाव अस्वच्छतेच्या मार्गावर

## कचरा पसरणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी क्लीन-अप मार्शल ठेवण्याची प्रितम म्हात्रे यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नव्याने नूतनीकरण झालेल्या वडाळे तलाव येथील परिसरात रात्रीच्या वेळी पनवेलकर नागरिक मोठ्या संख्येने चालण्यासाठी येत असतात . अशावेळी त्या ठिकाणी सोबत येताना पाण्याच्या बाटल्या, इतर खाद्यपदार्थच्या वस्तू घेऊन येतात . तसेच त्या परिसरात तरुण वर्ग सुद्धा मोठ्या संख्येने सायंकाळच्या वेळी उपस्थित असतो. आपल्या मित्र परिवारातील लोकांचे वाढदिवस सुद्धा तिथे साजरे केले जातात अशा प्रकारच्या वेगवेगळ्या गोष्टी तिथे सतत होत असतात. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सुरक्षेच्यादृष्टीने वेळोवेळी सूचना केल्या होत्या त्यापैकी काही अमलात सुद्धा आल्या आणि काही प्रगतीपथावर आहेत. परंतु पिण्याच्या पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे प्लास्टिकच्या थैल्या कागदी बॉक्स, केकचे रिकामे बॉक्स अशा प्रकारचा कचरा नागरिक तिथेच टाकतात किंवा तळ्यामध्ये फेकतात. येथील जॉगिंग ट्रॅक वर कुत्रे आणि मांजरी सर्रासपणे नागरिक फिरवण्यासाठी घेऊन येतात आणि त्यांच्या मार्फत केली गेलेली घाण ही त्या ट्रॅकवरच असते त्यामुळे इतर नागरिकांना त्याचा त्रास होतो, या अशा नागरिकांना जरब बसावी म्हणून त्यांनी पनवेल महानगर पालिकेच्या क्लीन-अप मार्शल च्या मार्फत सायंकाळच्या वेळी येथे गस्त ठेवून सदर कचरा पसरवणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करून तेथे स्वच्छता राहण्यास प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी केली आहे. या चांगल्या सवईसाठी नागरिकांकडून सुद्धा सहकार्य करण्यात येईल असे त्यांनी पालिकेला सांगितले.



> पनवेल शहरातील वडाळे तलावाला ऐतिहासिक वारसा आहे. हा वारसा जपण्यासाठी मी आणि आमच्या नगरसेविका डॉ.सौ सुरेखा मोहोकर, सौ.प्रीती जॉर्ज त्या ठिकाणी पाहणी साठी जात असतो आणि नागरिकांच्या सूचनेनुसार वेळोवेळी पाठपुरावा करून तिथे आवश्यक ते बदल करून घेत असतो. नागरिकांना आवश्यक त्या सोयी आपण तेथे केल्या. परंतु काही तरुण आणि इतर नागरिकां मार्फत त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या तेथे येणाऱ्या नागरिकांना होत आहेत अशी तक्रार माझ्याकडे तेथील जेष्ठ नागरिक आणि काही महिलावर्गा मार्फत आली. त्यावर त्या परिसरात अस्वच्छता पसरवणाऱ्या नागरिकांना जरब बसावी म्हणून मी ही सूचना केली आहे:
>
> **प्रितम जनार्दन म्हात्रे (विरोधी पक्ष नेता, पनवेल महानगरपालिका)**

# म्हसळ्यात रोज किमान दोन तास होणार भारनियमन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

वीज आणि कोळशाच्या टंचाई पाई लोड शेडिंगला सुरुवात झाली आसून राज्यात भारनियमनाचे संकट वाढत आहे. त्यामुळे जिथे विजेची तूट, वीज बिलांची वसुली कमी झाली आहे तिथे लोडशेडिंगला सुरुवात होणार असल्याची माहिती म.रा. वि.वि. आधिकाऱ्यानी दिली.

ज्या ठिकाणी बिल वसूली कमी होते त्या ठिकाणी भारनियमन जास्त करण्याचे सूत्र आहे. विजचोरी करणाऱ्या ठिकाणी भारनियमन जास्त प्रमाणात राहाणार आसल्याचे सांगण्यात आले. विजेची तूट आणि वसुली यावर आधारित ए ते जी ३ असे ग्रुप रहाणार आहेत. त्या-त्या भागांतून किमान १.३० ते ५ तास भारनियम होणार आसल्याचे सांगण्यात आले.

म्हसळा तालुक्याचा मुख्यभाग C वर्गात समावेश आसून लॉस आणि वसुलीची तूट पहाता २६ ते ३४ % प्रमाण आहे.

त्यामुळे म्हसळ्यातील बहुतांश भागात किमान २.३० तास भारनियमन रहाणार आहे. सध्या ते सी १ कॅटेगरीत आसून भारनियमन आवश्यकते प्रमाणे सकाळी ११ ते १२.३० आणि सायं.४ ते ५ या वेळी होणार आसल्याचे कार्यकारी अभियंता प्रदीप पटवारी यानी सांगितले.

# रायगडच्या संघाने पटकाविला ‘राज्यस्तरीय आ. प्रशांत ठाकूर चषक’ ; स्पर्धेत प्रो कबड्डीचा थरार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये झालेल्या राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य दिव्य कबड्डी स्पर्धेच्या अंतिम रोमांचक लढतीत सरस कामगिरी करत रायगड जिल्ह्याच्या मिडलाईन संघाने विजेतेपद तर चिपळूणच्या दसपट्टी संघाने उपविजेता होण्याचा मान पटकाविला. अत्यंत उत्तम आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे प्रो कबड्डीचा थरार या ठिकाणी क्रीडा रसिकांना अनुभवायला मिळाला. रविवारी रात्री झालेल्या स्पर्धेच्या अंतिम दिवशी एकाहून एक दिलखेच सामने पहायला मिळाले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने जय भवानी नवतरुण मंडळाच्या वतीने धरणा कॅम्प येथे पार पडलेल्या या स्पर्धेच्या विजेत्यांना रायगडचे माजी पालकमंत्री रविंद्र चव्हाण, विधान परिषदचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार रविंद्र चव्हाण आणि आमदार निरंजन डावखरे यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल कौतुक केले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे निरीक्षक मालोजी भोसले, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, प्रभाग समिती सभापती संजना कदम, नगरसेवक नितीन पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, नगरसेविका राजेश्री वावेकर, मोनिका महानवर, युवा नेते दिनेश खानावकर, दिनेश केणी, राजेश मपारा,सोपान जांभेकर, पंच प्रमुख सतिश सुर्यवंशी, सुर्यकांत ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष कदम, युवा नेते समीर कदम, सतिश कदम, मंडळाचे अध्यक्ष शेखर कदम, सचिव प्रशांत कदम, खजिनदार जितेंद्र कदम यांच्यासह पदाधिकारी, आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रात हुतूतू बंगालमध्ये हुडूडू चेन्नईत चेडूयुडू केरळमध्ये वंडीवडी उत्तर भारतात कोनवरा, साबरगण्णा पंजाब राज्यात झाबर गंगा, सौची पक्की अश्या वेगवेगळया नावांनी आणि थोडयाफार फरकाने हा खेळ खेळला जात होताच पण या खेळाला सर्वदुर एकच नाव असाव या करता महाराष्ट्र राज्याने प्रयत्न केले आणि अनेक भाषांची ही प्रादेशिकता जाऊन भारतात हा खेळ ’कबड्डी’ या नावाने ओळखला जातो. मैदानी या खेळाने देशात क्रीडा प्रकारात एक मानाची उंची राखली, त्याप्रमाणे

.../२

# उरण न्यायालयाचा ३२ वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण न्यायालयाचा ३२ वा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .त्या निमित्ताने विविध मनोरंजनाचे कार्यक्रम,विविध खेळ घेण्यात आले. संपूर्ण दिवस कार्यक्रम साजरे करण्यात आले

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सह.न्यायाधीश पोळ यांनी भुषविले होते. त्याच प्रमाणे प्रमुख अतिथी मा. २ रे सह.न्यायाधिश सौ.मॅडम पाठारे उपस्थित होते उरण तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.दत्तात्रेय नवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. पाहुण्यांचे स्वागत उरण वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.दत्तात्रेय नवाळे यांनी केले. या वेळी उरण तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड .दत्तात्रेय नवाळे, उपाध्यक्ष ॲड. भारती भोईर, ॲड. उपाध्यक्ष किशोर ठाकूर, ॲड.सचिव प्रसाद पाटील, खजिनदार ॲड. अर्चना माळी, ऑडिटर ॲड.संतोष पाटील, ॲड. अन्झीमन अन्सारी, ॲड.वृषाली ठाकूर, ॲड.धीरज डाकी, ॲड.पराग म्हात्रे, ॲड. विजय पाटील, ॲड.अमर पाटील व कुटुंबिय उपस्थित होते .

# सी.एम.ठाकूर यांची ओबीसी जनमोर्चा-सहयोगी संस्थेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शेतकरी कामगार पक्षाचे मुरुड तालुका सहचिटणीस तथा बोर्ली–मांडला विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे चेअरमन सी.एम.ठाकूर यांची ओबीसी संघर्ष समिती व ओबीसी जनमोर्चा या सहयोगी संस्थेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

ओबीसी संघर्ष समिती व ओबीसी जनमोर्चा–सहयोगी संस्थेच्या नुकत्याच माणगांवमध्ये प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत रायगड जिल्हा कार्यकारिणी ची निवड करण्यात आली.यामध्ये सी.एम.ठाकूर यांची संस्थेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

# वासगाव येथील युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगडचे कार्यसम्राट खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री ना. अदितीताई तटकरे व आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन पाटणसई ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य तथा विभागीय कार्याध्यक्ष सचिन कळसकर व माजी सरपंच झिमशेठ कोकरे यांच्या नेतृत्वाखाली नागोठण्याजवळील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील वासगाव या आदिवासी वाडी परिसरातील अनेक तरुण युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला त्यावेळी तरुणांचे आयकॉन आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी प्रवेशकर्ते तरुण कार्यकर्त्यांचे स्वागत करून तुम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मानसन्मानाने वागणुक दिली जाईलच तसेच तुमचा रोजगाराचा प्रश्न देखील साहेब व ताई यांच्या मार्गदर्शनाने मी निश्चितच सोडविण्याचा प्रयत्न करीन असे आश्वासन आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी प्रवेशकर्त्या तरुण कार्यकर्त्यांना दिले. दरम्यान चंद्रकांत बावदाने, मंगेश बोडेकर, प्रकाश बोडेकर, संतोष बोडेकर, राम बावदाने, हरेश झोरे, चिंतामण बावदाने, लक्ष्मण बावदाने, लक्ष्मण नारायण बावद–ाने, मंगेश बोडेकर, मोरू हंबीर यांच्यासह अनेक तरुण कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला शुक्रवार दि. २२ एप्रिल रोजी वासगाव येथे पार पडलेल्या या प्रवेश सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, जि.प. च्या माजी सदस्या सखुबाई पिंगळा, झिमाशेठ कोकरे, बाळासाहेब टके, सचिन कळसकर, विनय गोळे, हरेश कोकरे, दिनेश घाग, केतन भोय जानू कोकरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# गोवे-खांब ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचा मानाचा चषक जय बजिरंग हेटवणे संघानी पटकवला

**दै.रायगड नगरी । कोलाड**

खा. सुनिल तटकरे,राज्यमंत्री तथा रायगडच्या पालक मंत्री अदिती तटकरे,आ.अनिकेत तटकरे यांच्या सहकार्याने व रोहा तालुका समन्वय समिती सदस्य राकेश शिंदे, रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष विनोद भाऊ पाशिळकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोवे–खांब ग्रामीण क्रिकेट असोसिएशचा मानाचा चषक संभे येथील क्रिडांगणावर आयोजित करण्यात आला.या स्पर्धेत जय बजिरंग हेटवणे संघाने उत्तम कामगिरी करीत प्रथम क्रमांक प्राप्त करून मानाचा चषक पटकावला.

तर गावदेवी गावठाण महादेववाडी संघ द्वितीय, क्षेत्रपाळ पुई संघ तृतीय, तर श्री गणेश गोवे संघ चतुर्थ क्रमांकांचे मानकरी संघ ठरले.तर सामनावीर महादेववाडी संघाचा प्रतिक तिलटकर, उत्कृष्ट फलंदाज हेटवणे संघाचा देवेश वालंज, उत्कृष्ट गोलंदाज पुई संघाचा सामी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण श्री.गणेश गोवे संघाचा सार्थक दहिंबेकर तर पब्लिक हिरोचा किताब शिवशंभो गोवे संघाचा धनाजी शिगवण याला देण्यात आला.

या क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन व बक्षीस समारंभ आ. अनिकेत तटकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी राकेश शिंदे रोहा तालुका समन्वय समिती सदस्य, विनोद पाशिलकर रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष,जयवंत मुंडे रोहा तालुका युवक अध्यक्ष,नरेंद्र जाधव खांब विभागीय अध्यक्ष,महेंद्र पोटफोडे आदर्श सरपंच गोवे,सुरेश महाबळे सरपंच आंबेवाडी,वसंत भोईर रायगड भुषण तथा आदर्श सरपंच देवकान्हे,महेश पवार, संजय मांडळुस्कर,नितीन जाधव,संदीप जाधव,रविंद्र सागवेकर, राकेश कापसे,दिवाण सानप, डॉ. मंगेश सानप, रुपेश सानप,रुपेश महाबळे, महेंद्र जाधव,अनिल निकम, संभे पोलीस पाटील अनंत सानप व असंख्य मान्यवर उपस्थित होते.

सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी गोवे–खांब ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव,सचिव शरद वारकर, सह सचिव रुपेश धनवी, खजिनदार महेश चितळकर,उप खजिनदार महेश बामणे, माजी अध्यक्ष प्रवीण धामणसे व सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली.



**गव्हाण पंचक्रोशीतील गव्हाण, कोपर, शिवाजीनगर आणि शेलघर या चार गावांची ग्रामदेवता असलेल्या शांतादेवीची(देवी संतुबाय) दोन दिवसीय यात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, श्रीधरशेठ ठाकूर, उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, सुधीर ठाकूर, साईचरण म्हात्रे, किशोर पाटील यांच्यासह हजारो ग्रामस्थांनी शांतादेवीचे दर्शन घेतले.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, माझे अशिल कै.अर्जुन कानु उर्फ काना पाटील(मयत), कै.बाबुराव उर्फ अर्जुन पाटील(मयत), कै.गंगुबाई बाबुराव पाटील(मयत), कै.बारकुबाई चरू खुटारकर(मयत), कै.अनंता चरू खुटारकर(मयत), कै.नागुबाई चांगा पाटील(मयत), कै.बबन चांगा पाटील(मयत), कै.साईनाथ पांगा पाटील(मयत), कै.हिराबाई सखाराम निघुकर(मयत), कै.शांताबाई अनंता पावशे(मयत), यांचे वारस १) श्री.नारायण अर्जुन पाटील २) श्री.बबन अर्जुन पाटील ३) श्री.मारूती अर्जुन पाटील ४) श्रीमती.बेबीबाई लहु माळी ५) श्रीमती.साखरूबाई केशव पाटील ६) श्री.अनंता बाबुराव पाटील ७) श्री.दशरथ बाबुराव पाटील ८) श्रीमती.जानकी बुधाजी पाटील ९) श्रीमती.रामुबाई जनार्दन पाटील १०) श्री. रामदास चरू खुटारकर ११) श्री.मिलींद अनंता खुटारकर १२) श्रीमती.शितल सचिन घरत १३) श्रीमती. प्रनिता संदिप भोपी १४) श्रीमती.प्रियंका मयुर पाटील १५) श्री. हौसा अनंता खुटारकर १६) श्री.दशरथ चरू खुटारकर १७) श्री.यशवंत चरू खुटारकर १८) श्री.प्रभाकर चरू खुटारकर १९) श्रीमती.निराबाई काळुराम नाईक २०) श्रीमती. कमलाबाई बुधाजी भोपी २१) श्री.अनिल बबन पाटील २२) श्री.सुनिल बबन पाटील २३) श्रीमती. कविता उद्देश महादे २४) श्रीमती.गिता बबन पाटील २५) श्रीमती.बेबीबाई बबन पाटील २६) श्री.सदेंश साईनाथ पाटील २७) श्री.सुरज साईनाथ पाटील २८) श्रीमती.संध्या रूपेश भोईर २९) श्रीमती.सुरक्षा साईनाथ पाटील ३०) श्रीमती. वंदना साईनाथ पाटील ३१) श्री.अभिमंनु पांगा पाटील ३२) श्री.जानु पांगा पाटील ३३) श्री.प्रकाश पांगा पाटील ३४) श्री.संतोष पांगा पाटील ३५) श्रीमती.लक्ष्मीबाई बाळाराम उलवेकर ३६) श्रीमती.गुलाब हरिचंद्र पाटील ३७) श्रीमती. इंद्राबाई राम पाटील ३८) श्रीमती.माया गोपीनाथ पाटील ३९) श्रीमती. कल्पना भरत सांगडे ४०) श्रीमती.शकुंतला गणपत पाटील ४१) श्री.तुकाराम सखाराम निघुकर ४२) श्री.संजय सखाराम निघुकर ४३) श्रीमती.ताराबाई पशुराम गोंधळी ४४) श्रीमती.शेवंताबाई कृष्णा म्हात्रे राहणार : घोट, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांना फाईल नं. १४ , येथील तलोजा पाचनंद नोड, प्लॉट नं ३३ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्ग त सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडूनखालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन करारनामा झाला आहे. वर नमुद शेतक–याकडून खालील वर्णन केलेला भूखंड शेतकरी यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक १४ तळोजा पाचनंद नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १० | ३३ | २५० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
ॲड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१२४/१३, से–१२, खारघर
मो.नं.८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे सुचना देण्यात येते की शेतकरी १) श्री.जगन्नाथ पोशा कोळी उर्फ वास्कर, २) श्री.मदन पोशा कोळी उर्फ वास्कर, ३) श्री.हनुमान पोशा कोळी उर्फ वास्कर, ४) श्री.जनार्दन जोम कोळी, रा.पेठ गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, नवी मुंबई यांना सिडको लि.कडून मौजे : नोड तळोजा, नवी मुंबई, येथील फाईल नं.१००२ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकऱ्यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे माझे अशिल श्री.जतीन देशभूषण अगरवाल, २) श्री.अनिल परुमल गरेरा, रा.सी टु टाईप, बिल्डींग नं.१, युनिट नं.४, सेक्टर २, वाशी नवी मुंबई यांनी खालील वर्णन केलेला भूखंड हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक १००२ (तळोजा नोड)**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड | १८ | २ अ | २०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
ॲड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१२४/१३, से–१२, खारघर
मो.नं.८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतसमोर लिहिलेल्या मालक श्री.लहू हेमला भिंगारकर हे त्यांचा सहहिस्सेदार मुलगा म्हणजेच आमचे अशिल नामे श्री.मंगेश लहू भिंगारकर यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.लहू हेमला भिंगारकर २) श्री.मंगेश लहू भिंगारकर | CHID-ICIG-103 | वडघर (पुष्पक नोड) | आर ३ | ८१ | २९० चौ.मी. (पैकी त्यांचा अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०४/२०२२

सही/–
कु.दिपाली रामदास गावंड
(ॲडव्होकेट हायकोर्ट)
शॉप नं.९, ए विंग, रचना रेसिडेन्सी,
टिळक रोड, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड

मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.५००/२०२२
ने.ता.२७/०५/२०२२

श्री.राजेश रामाशंकर मौर्या
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : धंदा
सध्या रा.घर नं.८८२, मैत्री कॉम्प्लेक्स,
रुम नं.४०७/सी, खुटुकबांधन खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, तळोजा
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कु. राहूल राजेश मौर्या ह्याचा जन्म दि.२९/०१/२०१८ रोजी रा.स्काय व्हॅली बिल्डींग, सेक्टर–३४, पारसी पाडा खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.राहूल राजेश मौर्या यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातल मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.


सही/–
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल


# अमोल मिटकरी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करा ब्राम्हण सभेची मागणी





**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

ब्राम्हण सभा माणगांवच्या वतिने शनिवार दि. २३ एप्रिल रोजी माणगांव पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक यांना हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या म्हणुन राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी तक्रार एका निवेदन पत्राद्वारे देण्यात आली आहे. ईस्लामपूर जिल्हा सांगली येथे दि.२२ एप्रिल रोजी झालेल्या राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यक्रमात व्यास–पिठावरुन हिंदू धर्माचा अपमान होईल असे वक्तव्य आमदार अमोल रामकृष्ण मिटकरी यानी केले होते.

हिंदू धर्मशास्त्रात विवाह हा सोळा संस्कारा पैकी एक मानला जातो. विवाह शास्त्रा मध्ये कन्यादान हे हिंदू धर्मिय पवित्र विधी मानतात. मम भार्या समर्पयामी असा कन्यादान विधी मध्ये कोठेही उल्लेख नाही. परंतू हिंदू धर्माच्या व हिंदू धर्मियांच्या भावना दूखावणे व मुख्यतः ब्राम्हण समाजाच्या भावना दूखावणे, हिंदू धर्माचा अवमान करणे, उपमर्द करणे म्हणुन मुद्दामहून जाहीरपणे व्यासपीठावर महाराष्ट्र शासनातील कॅबिनेट दर्जाचे दोन मंत्री हजर असताना अमोल मिटकरी यानी हे भाष्य केले आहे.

मम भार्या समपर्यामी त्यांच्या या भाष्या मुळे हिंदू धर्मीयांच्या तसेच स्त्रियांच्या सुध्दा भावना दुखावल्या गेल्या आहेत. या निवेदनाद्वारे माणगांव ब्राम्हण सभेचे अनेक सदस्यांसह सभेचे अध्यक्ष शेखर गोडबोले, उपाध्यक्ष नितीन पेंडसे, सचिव प्रसाद खरे यांनी भारतीय दंड संहिता कलम २९५, २९५(अ) अन्वये मिटकरीं विरुध्द गुन्हा दाखल करावा अशी तक्रार दिली आहे. यावर पोलीस आता कोणते पाऊल उचलणार याची माणगांव मध्ये उत्सुकता आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रायगडच्या संघाने पटकाविला 'राज्यस्तरीय आ. प्रशांत ठाकूर चषक' ; स्पर्धेत प्रो कबड्डीचा थरार

या खेळाला आणि खेळाडूंना सन्मान देण्याचे काम पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प येथे झालेल्या 'राज्यस्तरीय आमदार प्रशांत ठाकूर चषक भव्य दिव्य कबड्डी' स्पर्धेने केले. मैदानी खेळाची हि परंपरा टिकवण्यासाठी नवनवीन संकल्पना आखण्यात येतात त्याच अनुषंगाने जणू प्रो कबड्डीचे सामने या मैदानावर होत आहेत आणि एकाहून एक सरस चढाईने यामध्ये रोमांचक थरार पहायला मिळाला. हार जीत होतच असते पण शिस्तबद्ध आणि सुंदर नियोजन या ठिकाणी डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. कबड्डीतील ज्येष्ठ खेळाडूंचा सन्मानही या ठिकाणी होताना त्यांच्या प्रती आदरभाव अधोरेखित होत होता. सूत्रसंचालन प्रो कबड्डीचे प्रसिद्ध समालोचक मिलिंद पाटील व किशोर गावडे यांनी केले. आपल्या वक्तृत्व शैलीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. दिनांक २२ ते २४ एप्रिल पर्यंत झालेल्या या स्पर्धेत अनेक सामने थरारक झाले. शेवटच्या क्षणापर्यंत निकाल काय लागणार याची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. आणि त्याचा मनमुराद आनंद प्रेक्षकांनी अनुभवला.


## मर्यादित ई–निविदा सूचना
## ग्रुप ग्रामपंचायत आकुर्ली–रायगड
**सुचना क्रमांक सन २०२२–२३**

ग्रुप ग्रामपंचायत आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडील खालील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट बांधकाम कामासाठी योग्य नोंदणीकृत निविदाधारकांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

| अ.क्र. | योजनेचे नाव | निविदा रक्कम | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | Construction of cement concrete Road From Apeksha Complex to Akruli, v.p. Akurli Tal-Panvel | १७,५६,२३३/– | ५००/– | १७,५६२/– | ९० दिवस |
| २ | Cost of cement concrete road & gutter from govind bhopi to tulasi vihar society at- v.a. akurli Tal-Panvel | ५६,९१,०३४.००/– | ५००/– | ५६,९१०/– | ९० दिवस |

ई टेंडरद्वारे कमीत कमी ३ निविदा प्रति प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण होईल.

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीद्वारे होईल.

सदर निविदा, नोटीस, सूचना शुद्धीपत्रक, वरील कामासाठी निविदेच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध होईल.

सही/–
सौ.भारती सचिन पाटील
सरपंच
ग्रामपंचायत आकुर्ली
ता.पनवेल, जि.रायगड

सही/–
श्री.जयेंद्र घनश्याम म्हात्रे
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आकुर्ली
ता.पनवेल, जि.रायगड


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आदर्श समतानगर रहिवासी मंडळाचे अध्यक्षपदी अविनाश सुर्वे तर सचिवपदी प्रतिक मोरे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**


आदर्श समता नगर रहिवासी मंडळाची सभा रविवार दिनांक २४ एप्रिल रोजी आदर्श समता नगर येथील साई मंदिरात सकाळी १० वाजता पार पडली या सभेत मंडळाची नविन कार्यकारिणी सर्वानुमते बिनविरोध जाहीर करण्यात आली असुन यावेळी या विभागातील तरुण नेतृत्व अविनाश सुर्वे यांची अध्यक्ष तर युवा पत्रकार प्रतिक मोरे यांची सचिव आणि युवा कार्यकर्ते सिद्धेशभाई पिंगळे यांची खजिनदार पदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

तसेच येथिल मंडळाचे सदस्य उद्योजक नितीन बामगुडे व मंगेश निंबाळकर या दोघांची मंडळाचे उपाध्यक्ष पदी तर सह- सचिव पदी सुहास जगे, सहखजिनदार पदी संजय साठे, कार्याध्यक्ष पदी सुरेखा दांडेकर यांची निवड करण्यात आली असुन मंडळाचे माजी अध्यक्ष अनंत गोळे व माजी सचिव संतोष रणपिसे यांच्या नेतृत्वात ही सभा अत्यंत खेळी मेळीच्या वातावरणात पार पडली असुन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे येथील सर्व रहिवासी नागरिकांकडुन अभिनंदन केले जात आहे.

## नगरसेवक राजू सोनी यांनी केलेल्या मदतीमुळे वीजेचा प्रश्न निकाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील पटेल मोहल्ला, कुंभारवाडा परिसरातील विद्युत पुरवठा साधारण १० ते १५ तासाच्या वर खंडीत झाला होता. याबाबतची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना मिळताच त्यांनी तत्परतेने हा प्रश्न निकाली काढला आहे.



नगरसेवक राजू सोनी काही कामानिमित्त पनवेल बाहेर होते. दरम्यानच्या काळात शहरातील काही भागाचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने त्यासंदर्भातील माहिती राजू सोनी यांना कळविली. तातडीने त्यांनी विद्युत पुरवठा विभागाचे अधिकारी मोरे यांच्याशी संपर्क साधून त्यांना या नागरी प्रश्नाबाबत विचारले असता सदर विद्युत पुरवठा सुरू करण्यासाठी मोठ्या क्रेनची आवश्यकता असल्याने राजू सोनी यांना सांगितले. तात्काळ राजू सोनी यांनी सदर क्रेन भाड्याने देणाऱ्या व्यक्तींशी संपर्क साधून स्वःखर्चाने भाडे भरुन ती क्रेन वीज वितरण कंपनीच्या ताब्यात दिली व त्यानंतर सदर प्रश्न क्रेनच्या सहाय्याने निकाली काढून विद्युत पुरवठा सुरळीत झाला. राजू सोनी यांनी तत्परतेने केलेल्या मदतीचे त्या भागातील सर्व नागरिकांनी कौतुक व आभार मानले आहेत.

# सुवर्ण महोत्सवी वर्षात कृषी विद्यापीठ, दापोली येथे सुवर्ण पालवी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कोकणचा मानबिंदू असलेल्या कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना दापोली येथे दि. १८ मे १९७२ रोजी झाली. कोकणच्या कृषी विकासाचे शिल्पकार कै. पी. के. उर्फ बाळासाहेब सावंत यांची स्मृती म्हणून त्यांचे नाव देऊन या विद्यापीठाचा नामविस्तार दि. १२ फेब्रुवारी २००१ रोजी करण्यात आला. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे कोकणातील बृहन्मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये विख-रलेले आहे. या विद्यापीठाच्या कृषी, मत्स्य आणि कृषी अभियांत्रिकी अशा तीन विद्याशाखा आहेत. विद्यापीठाद्वारे मागील ५० वर्षांपासून कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्ताराचे काम अतिशय प्रभावीरीत्या सुरू आहे. सन २०२१-२२ हे वर्ष विद्यापीठाचे ' सुवर्ण महोत्सवी वर्ष ' असल्याने त्यानुषंगाने ' सुवर्ण पालवी ' या नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन दि. १३ ते १७ मे २०२२ दरम्यान दापोली येथे करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाबरोबरच इतर संस्थांनी केलेले कार्य, कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती व्हावी, या दृष्टीने महाराष्ट्रातील इतर तीन विद्यापीठे, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, इतर विकास विभाग, कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या खाजगी कंपन्या, निमशासकीय संस्था, महामंडळे, बँका, बचत गट इ. या कृषी प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाची ओळख होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रावर प्रत्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर परिसंवाद, चर्चासत्र, शिवारफेरी, प्रशिक्षण, खाद्यपदार्थ स्पर्धा इ उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न राहणार आहे.

कृषी तंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणे विद्यापीठाच्या उपलब्धी, शासकीय योजनांची माहिती, शेती उत्पादन विक्री व्यवस्था, विद्यापीठ व इतर संस्थांचा शेतकऱ्यांशी समन्वय, कोकणच्या शेती प्रगती संबंधी चर्चा घडवून आणणे, ही या महोत्सवाची उद्दिष्ट्ये आहेत. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, कृषी विद्या प्रक्षेत्र, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र केंद्र, पाणलोट उद्यान, आंबा गुणवत्ता केंद्र, भाजीपाला प्रक्षेत्र, चरक उद्यान, बांबू प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, बांबू प्रक्रिया केंद्र, जैविक खते उत्पादन केंद्र, पॉलिहाऊस, जैव तंत्रज्ञान, रबर लागवड व प्रक्रिया, कीटकशास्त्र संग्रहालय, फळ रोपवाटिका, नारळ बागेतील आंतरपिके, अवजार संग्रहालय इ उपक्रमाला भेट देता येईल. त्याचप्रमाणे सूक्ष्म सिंचन पद्धती, औषधी वनस्पती, बांबू लागवड, बांबू प्रक्रिया, रबर प्रक्रिया, कलम पध्दती, नारळ बागेतील आंतरपिके, मत्स्य संवर्धन व प्रक्रिया, अळंबी उत्पादन, कडधान्ये, गळीत धान्ये, सेंद्रिय शेती, फळे, भाजीपाला व फुलपिके, मृद व जल संधारण पद्धती, सौर ऊर्जा उपकरणे, कृषी यंत्रे व अवजारे, पशुपक्षी व्यवस्थापन, चारापिके इ विषयावरील प्रात्यक्षिकांचा लाभ घेता येईल. यानिमित्ताने पशुसंवर्धन तंत्रज्ञान, मत्स्यपालन, औषधी व सुगंधी वनस्पती, कृषी पर्यटन, कृषिपूरक व्यवसाय, महिला सक्षमीकरण, सेंद्रिय शेती, निर्यातक्षम फळे व भाजीपाला उत्पादन, सुक्ष्मसिंचन तंत्रज्ञान, कृषी यांत्रिकीकरण, खार जमीन सुधारणा, बदलते हवामान आणि कोकणची शेती या विषयांवर परिसंवाद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन व समारोप समारंभास राज्यपाल महामहिम भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील , कृषी आणि माजी सैनिक कल्याण मंत्री दादा भुसे, फलोत्पादन मंत्री संदीपराव भुमरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रज्ञान मंत्री उदय सामंत, परिवहन मंत्री अनिल परब, वस्त्रोद्योग, बंदरे आणि मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, कृषी राज्यमंत्री विश्वजित कदम, पर्यटन व फलोद्यान राज्यमंत्री अदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, खासदार विनायक राऊत, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे उपाध्यक्ष प्रकाश अबिटकर प्रभृती उपस्थित राहणार आहेत.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, विस्तार शिक्षण संचालक डॉ. संजय भावे, संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर, शिक्षण संचालक डॉ. सतीश नारखेडे पितांबरी उद्योग समूहाचे व्यवस्थापक रवींद्र प्रभुदेसाई व मुख्य परिचालन अधिकारी मधुकर पुजारी हे सदर महोत्सवाचे आयोजक असून त्याच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेत आहेत, असे कर्जतच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी कळविले आहे.

# ओवळे येथे छकड्यांच्या शर्यती संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रामस्थ मंडळ ओवळे आयोजित गावदेवी ओवाळू माता यात्रेनिमित्त छकड्यांच्या जंगी शर्यतीचे आयोजन नंदराज मुंगाजी यांच्या अध्यक्षतेखाली ओवळे येथील मैदानात करण्यात आले होते. या शर्यतींना महाराष्ट्र बैलगाडा संघटना अध्यक्ष पंढरीशेठ फडके यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

बैलगाडा शर्यत हा केवळ मनोरंजनाचा विषय राहिलेला नाही तर राज्याची परंपरा आणि शर्यतीबद्दल सर्वसामान्यांना किती प्रेम आहे याचे दर्शन रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ओवळे येथील बैलगाडा शर्यतीच्या कार्यक्रमादरम्यान घडून आले आहे. ओवळे येथे ओवाळू माता यात्रेनिमित्त विना काठी लाठी भव्य बैलगाडा शर्यती पार पडल्या.

गेल्या अनेक दिवसांपासून बैलगाड्या शर्यती ह्या पार पडलेल्या नव्हत्या. त्यामुळे यंदाच्या बैलगाडी शर्यतीचे एक वेगळेपण होते. या दरम्यान मोठी गर्दी होणार याचा अंदाज वर्तवला जात होता. अतिशय उत्साहात या छकडयांच्या शर्यती ओवळे येथील मैदानात पार पडल्या.

शासकीय नियमांचे पालन करून बैलगाडा शर्यत सुरू करण्यात आल्या. यावेळी अनेकांनी या छकडयांच्या शर्यती पाहण्यासाठी छकडे प्रेमींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

यावेळी शर्यती पाहण्यासाठी आलेल्या प्रेमींना पंढरीशेठ फडके आणि नंदराज मुंगाजी यांनी मार्गदर्शन केले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## टँकरच्या धडकेमुळे इसम जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका टँकरची धडक बसल्याने एक इसम जखमी झाल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये घडली आहे

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये एका ट्रान्सपोर्ट मध्ये क्लिनर चे काम करणारा मोरारी ठाकूर (वय २२) याला टँकरसमोरील फिडल पंप बटन क्लिनर शेर बहादूर यादव यानी दाबायला सांगितले असता त्याला टँकरचा धक्का लागल्याने त्याच्या उजव्या बाजूचा टायर त्यांच्या डाव्या बाजूच्या खांद्याला घासल्याने मोरारी ठाकूर हा झकमी झाला आहे. या घटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

## रायगड जिल्हा शिंपी समाज सहसचिव पदी सौ. नीता ढवळे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

अलिबाग येथील शिंपी समाज मंदिरात शिंपी समाजाची सभा संपन्न झाली. यामध्ये पुढील कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. रायगडजिल्हा शिंपी समाज अध्यक्ष पदी पुरुषोत्तम मुळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

अरुण करंबे यांची विश्वस्त पदी, दिलीप उर्फ बाबा मेकडे, कार्याध्यक्ष पदी दत्तात्रेय पंढरकामे तर म्हसळा येथील सौ. नीता महेंद्र ढवळे यांची सहसचिव पदी निवड करण्यात आली. सौ. नीता ढवळे या संयमी, शांत आणि सुस्वभावी असून त्यांनी म्हसळा शिंपी समाज महिला अध्यक्ष पदी अतिशय सुंदर आणि प्रामाणिक पणे काम केले आहे. त्यांना समाज कार्याची आवड असून त्यांनी त्यांच्या अध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत अनेक समाजपयोगी उपक्रम राबविले आहेत.

प्रत्येकाच्या सुख –दुःखात अग्रेसर राहण्याची आवड अश्या विधायक कामांमुळेच त्यांची सहसचिव म्हणून नियुक्ती झाली असून त्यांच्या निवडीने त्यांचे समाजाकडून अभिनंदन होत आहे.

# शासकीय अध्यापक महाविद्यालयामध्ये पदवीदान समारंभ थाटात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमूख पाहुणे म्हणून सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज, मुंबई येथील प्राचार्या डॉ. मसरत अली उपस्थित होत्या.

प्रमूख पाहुण्यांचे स्वागत लेझीम नृत्य, तारपा नृत्याने केले गेले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. नीलीमा अरविंद मोरे यांनी केले.

या प्रसंगी या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुविद्या महेश सरवणकरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण म्हणजे काय? हे समजावून सांगितले, त्यांनी या प्रसंगी अब्राहम लिंकन यांनी मुख्याध्यापकास लिहिलेले पत्र वाचून दाखविले. शेवटी पदवीसाठी उपस्थित राहिलेल्या छात्राध्यापकांकडून शपथ घेतली गेली. प्रमुख पाहुण्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा आदर्श सर्व विद्यार्थ्यांनी ठेवावा असे आ-वाहन केले.

तसेच शिक्षण घेण्याची खरोखरच मनापासून जर इच्छा असेल तर कोणतेही संकट हे मोठ नसत त्यातून मार्ग हा १००% निघतो फक्त त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा आवश्यक आहे असे सांगितले. या प्रसंगी शैक्षणिक वर्ष २०१९-२१ च्या बी. एड आणि एम एड च्या छात्राध्यापकांनी पदवी घेण्यासाठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन ऋतुजा हेलवाडे यांनी केले असून आभारप्रदर्शन प्रा. बिजली दडपे यांनी केले संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी डॉ. नीलीमा अरविंद मोरे यांनी स्विकारली.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस माहिती होणेसाठी कळविण्यात येते की, आमचे वडील १) श्रीमती.वनिता नाथा झेमसे व त्यांची मुलगी २) सौ.सुचिता सागर तेरडे, दोघी रा.३०२, दुर्वांकुर अपार्टमेंट, कर्नाळा स्पोर्टस् ॲकेडमीच्या मागे, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नावे मौजे : जिते, तालुका : पेण, जिल्हा : रायगड येथे काही जमीन मिळकती आहेत. सदर जमीन मिळकतीचे जवळ श्री.काशिनाथ अनंता पाटील व श्री.सदानंद कमळाकर तांडेल सह इतर १७ यांचे सामायिक नावे भूमापन क्रमांक व उपविभाग २०/१, क्षेत्र ०-१७-७०, पो.ख. ०-०-०, एकूण क्षेत्र ०-१७-७०, आकार रु.४.३१ ही मिळकत आहे.

तरी आमचे अशिल हे श्री.काशिनाथ अनंता पाटील व श्री.सदानंद कमळाकर तांडेल सह इतर १७ यांचे सामायिक नावे असलेली मौजे : जिते, तालुका : पेण, जिल्हा : रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २०/१, क्षेत्र ०-१७-७०, पो.ख. ०-०-०, एकूण क्षेत्र ०-१७-७०, आकार रु.४.३१ ही जमीन मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याच्या विचारात आहेत व तसा करार करण्यासंबंधी उभयपक्षीयांमध्ये बोलणे चालू आहे.

सबब, आमचे अशिल हे या नोटीसीद्वारे असे कळवितात की ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात दिवसांचे आत या व्यवहारासंबंधी कोणाची हरकत असल्यास अथवा भूमापन क्र.२०/१ या मिळकतीत अन्य कोणाचा हक्क हितसंबंध बोजा असल्यास अथवा अन्य कोणतेही प्रकारचा करार मदार झाला असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती खालील सही करणारे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. अन्यथा आमचे अशिल हे कोणाची काही हरकत नाही असे गृहीत धरुन सदरचा करार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीस आमचे अशिल बांधील राहणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.पुनम नाईक**
**५२ बंगलो सोसायटी, प्लॉट नं.१०,**
**गणेश कृपा जुने पनवेल,**
**नवी मुंबई-४१०२०६**
**मो.नं.८७६७१७४४१४**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री.विलास गजानन घरत** खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचा करार केला आहे. श्री.अनिकेत अशोक वाघ खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक आहेत त्यांना सदरची मिळकत वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. सदरची मिळकत साठेकरार (Agreement for sale) या दस्ताने त्यांच्या वडिलांच्या (श्री.अशोक रंभाजी वाघ) नावे आहे. साठेकरार (Agreement for sale) दस्त क्रमांक प.व.ल.१३६७/२००० दिनांक ०६/०४/२००० रोजी दुय्यम निबंधक पनवेल यांचेकडे नोंद केलेला आहे. सदरचे मुळ दस्त घराचे काम चालू असल्यामुळे सामानाची उलथा-पालथ झाल्यामुळे सदरचे मुळ दस्त गहाळ झाले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**फ्लॅट क्रमांक-३, तळमजला, ''भवानी दर्शन''**
**मिळकत क्र.-१९५, मौजे : पालीदेवद,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

सदरची मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काच्या प्रत्यक्ष ताबेकब्जात असून ती सदरच्या मिळकतीतील हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांनी खरेदी करण्याचा करार केलेला आहे.

तरी वर वर्णन केलेली मिळकतीबाबत मुळ दस्त क्रमांक प.व.ल. १३६७/२००० दिनांक ०६/०४/२००० कोणास भेटले असेल तर तो व इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, लीज, ॲटॅचमेंट, लीन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्यही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार खालील दिलेल्या पत्यावर कळवणे व प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मालकीच्या सदनिकाचा खरेदीखत (Sale Deed) करतील. याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०४/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.किशोर टोम्पे**
**रुम नं.२१०, ए विंग, सिम्फोनी को.हौ. सोसायटी, प्लॉट नं.३१, सेक्टर ३, नवीन पनवेल, जिल्हा : रायगड, पिन-४१०२०६**
**मो.नं.९८२०३७३८२८**



मा.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.४९७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०६/२०२२

श्रीमती.चांगुणा नारायण घरत
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घारापूरी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. श्रावण कान्हा भोईर हे दि.१३/०२/२००६ रोजी घारापूरी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांची पत्नी मंगुबाई श्रावण भोईर ही दि.२८/११/२०१४ रोजी मयत झाली आहे. तसेच दुसरी पत्नी सोमी श्रावण भोईर ही दि.१२/०५/१९७० रोजी मयत झाली आहे. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| न्हावे-४ | बी | १३ | ०-७१-५ | ३.८७ |

अर्जदार हे कै.श्रावण कान्हा भोईर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस असे सुचित करण्यात येत आहे की, १) श्री.जगन उर्फ जगन्नाथ सोंग्या म्हात्रे, २) श्री.अरुण सोंग्या म्हात्रे, १ व २ रा.मु.पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड ३) कु.निर्मला सोंग्या म्हात्रे उर्फ सौ.निर्मला नरेश पाटील, रा.निलजे, काटई (ठाणे) आणि ४) श्रीमती.सुंदराबाई पांडुरंग गंधारकर, रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड (मुळ मालक) यांच्या नावे सिडको मार्फत १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात खालील भूखंडाचे वाटप केले आहे. माझे अशिल हे मुळ मालकाकडून सदरहू भूखंड हा मे.ड्रिम वर्ल्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.अखिलेश रामरक्षा सिंह, २) श्री.महेश ज्ञानदेव पोपळे यांनी भूखंड विकसित कराराने ५०-५० टक्के तत्वावर विकसनाकरिता घेतलेला आहे. सदरहू संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिडको फाईल नं.१२/नावडे**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गुंठे |
|---|---|---|---|---|
| नावडे | २४/१३ | २२३ | ३ | ०.२०.४ |
| | | २०९ | २ | ०.०८.१२ |
| | | २०८ | ९ | ०.०७.०८ |
| | | १५३ | ० | ०.२४.०८ |
| | | एकूण | | १.२१.०० |

तरी वर नमूद संपादीत मिळकत / भूखंडाचे मालक यांचे व्यतिरिक्त जर कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर मिळकतीबाबत / भूखंडाबाबत विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ठ्यार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सादर करावी. आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर संपादीत मिळकत / भूखंड सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनातून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल. आणि कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर संपादीत मिळकतीचा / भूखंड विकसित करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

**सही/-**
**मिलन जयभिम जंगलबाग**
**(वकील हायकोर्ट)**
**यश कॉम्प्लेक्स सोसायटी,**
**से.८, शॉप नं.१८, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.७३०४३२१७८७**



### जाहीर नोटीस

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटर वाहन क्र. MH 46 AC 2359 चे मालक प्रमोद अनंत नरसिंगे २०/०७/२०१९ रोजी निधन झालले आहे.

प्रमोद अनंत नरसिंगे पत्ता : मु.पो.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ येथे राहण्यास होते.

उपरोल्लिखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी श्री.राजेंद्र अनंत नरसिंगे असल्यामुळे सदर वाहनाचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या वाहनाचा माझे राजेंद्र अनंत नरसिंगे नावावर हस्तांतर होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे अर्ज केलेला अहे.

याबाबतीत दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत खालील सही करणार यांचेकडे नोंदवावी.

**सही/-**
**ॲड.रश्मी बळीराम जाधव**
**मरिआई बिल्डींग, बी विंग, ००३,**
**कोप्रोली, पो.नेरे, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस असे सुचित करण्यात येत आहे की, माझे अशिल श्री.जगन उर्फ जगन्नाथ सोंग्या म्हात्रे, रा.मु व पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड यांना साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत मौजे : नोड नावडे, येथील सिडको फाईल नं.१२, युनिट केस नं.२४/१३, फेस २, सेक्टर नावडे मधील भूखंड क्रं.१४०, क्षेत्र ५५० चौ.मी. (यांस यापुढे संक्षिप्तेकरिता व सोईकरिता ''सदरहू मिळकत'' असे संबोधले जाईल.) सदरहू मिळकतीचा खालील नमूद दस्त राहते घरामधून कुठेतरी हरविला / गहाळ झालेला आहे. त्यासंदर्भात माझे अशिलांनी तळोजा पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे दिनांक १८/०४/२०२२ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नं.०३१६/२०२२ या क्रमांकाची तक्रार नोंदविली आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**दस्ताचा तपशिल**

ALLOTMENT LETTER ISSUED BY CIDCO
ON DATED 16.11.2007 सिडको/भूमी/साट्यो/नावडे II/संगणकीय सोडत/७/२००७
FILE NO. NAVADE-II : 12 (PLOT NO 140, NAVADE NODE, 550 SQ. MTR.)

(सदरहू मिळकतीचे वर नमूद दस्ताऐवजाच्या मुळ प्रत हरविली आहे.)

तरी सदरहू उपरोक्त मिळकत माझे अशिलांनी विकसनाकरिता देण्याचे ठरविले आहे. जर कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा मिळकतीबाबत / भूखंडाबाबत विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ठ्यार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सादर करावी. आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर संपादीत मिळकत / भूखंड सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनातून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल. आणि कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर संपादीत मिळकतीचा / भूखंड विकसित करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

**सही/-**
**मिलन जयभिम जंगलबाग**
**(वकील हायकोर्ट)**
**यश कॉम्प्लेक्स सोसायटी,**
**से.८, शॉप नं.१८, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.७३०४३२१७८७**

